# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वर्ष ४४ अंक १

|| मराठी तितुका मेळवावा ||


On the Web www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

जानेवारी २०२४ मार्गशीर्ष/पौष शके १९४५


## अध्यक्षीय

प्रिय मित्र मैत्रिणींनो,



सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! गेल्या वर्षभरात १३०० मराठी शाळा विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण, १०० युवांची इंटर्नशिप, ५००हून अधिक विवाह इच्छुकांची रेशीमगाठीमध्ये नाव नोंदणी, नाटक, संगीत, कलाकारांचे ६ निरनिराळे दौरे, उत्तररंगचे २४-२५ कार्यक्रम, फिलॉसॉफीचे ४०-४५ कार्यक्रम, मेडिटेशनचे ४०-४५ कार्यक्रम, क्रिकेटची टूर्नामेंट, ५००० हून अधिक लोकांची वॉक-ए-थॉन, पॉडकास्टचे ४०-४५ कार्यक्रम, फिल्म क्लबची ८-१० सत्रे, वारसाच्या १०-१२ मुलाखती, ११ वृत्ते व १ सुंदर दिवाळी अंक, शास्त्रीय संगीताच्या २ वर्गांची सुरवात, करावकेची १८-२० सत्रे, ८ जणांचे छंदबद्ध काव्य प्रशिक्षण, ५०हून अधिक पुरोहितांचे प्रशिक्षण, बीकनेक्टची ४०-४५ सत्रे, २ मैत्री मेळावे, ३० हून अधिक उपक्रम असे व्यापक काम बीएमएम २.० संकल्पनेतून २५० स्वयंसेवकांच्या, माझ्या कार्यकारिणीच्या निस्वार्थी कामातून, प्रचंड मेहनतीतून, साकार झाले. माझ्या या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! आज बीएमएम प्रकल्पांत दर महिन्याला ५००० हून अधिक लाभार्थी भाग घेत आहेत. आपल्या समाजाचा हा फार मोठा विजय आहे!

लोकांसाठी, लोकांनी, लोकांचे हा आपला संकल्प पूर्ण होताना बघून मला खूप आनंद होत आहे. २०२४ मध्ये प्रचंड काम करायचे आहे!

जानेवारी २७-२९, २०२४ मध्ये महाराष्ट्र शासन विश्व मराठी संमेलन आयोजित करत आहे. यावर्षी पहिल्यांदाच आपण १०० हून अधिक कार्यकर्त्यांचे बीएमएम पथक मुंबईत या संमेलनात पाठवत आहोत. बीएमएमची ख्याती व कामाची महती यामुळे अजून जगभरात मोठ्या प्रमाणात पसरेल याची मला खात्री आहे.

बीएमएम २०२४ अधिवेशन ६ महिन्यावर आले आहे! गेल्या ३-४ महिन्यांच्या अल्पावधीतच २२ मंडळांच्या मदतीने आपण ९४ ब्लॉक्सची विक्री केली - २५००हून अधिक तिकीटे विकली! स्वागत आणि आतिथ्य, भोजन, कार्यक्रम, डेकोरेशन, तंत्रज्ञान, फॅसीलिटी, फंड-रेझिंग, मार्केटिंग, स्मरणिका इत्यादी समित्यांचे काम जोरात चालू आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तुम्ही तिकीटे घेतलीत का? अधिक माहीतीसाठी तुमच्या मंडळात किंवा **bmm2024.org** ला भेट द्या. अधिवेशन म्हणजे आपल्या उत्तर अमेरिकेतील मराठी समाजाचा महा-यज्ञच आहे. त्यात तुमचे योगदान तर पाहिजेच!

तुम्ही सर्वांनी **bmm2.org/app** install केले आहेत का? या app मध्ये तुम्हाला सर्व प्रकल्पामध्ये नावनोंदणी करता येईल, सर्व कार्यक्रमांची माहिती मिळेल, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे आधीचे अहवाल, जुनी वृत्ते वाचता येतील. BMM 2.0 App ची link तुम्ही तुमचे नातेवाईक व मित्र मैत्रिणींबरोबर नक्की share करा.

आता सांख्य-कारिका मधील एका श्लोकाने थांबतो:

प्रिती अप्रिती विषादात्मकाः प्रकाश प्रवृत्ती नियमार्थाः । अन्य अन्य अभिभव आश्रय जनन मिथून वृत्तयश्च गुणाः ॥
(सत्व, रजस व तमस) ह्या तीन गुणात सुख, दुःख व मंदत्व आहे. हे प्रकाश, क्रियाशीलपणा व संयम आणतात आणि एकमेकांवर वर्चस्व, अवलंबित्व, निर्मिती व संघटन करतात. (ज्यातून हे जग निर्माण होते)
शुभेच्छा,


संदीप दीक्षित
*अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४ / President, Bruhan Maharashtra Mandal (BMM) 2022-24*

+1 216-926-6696
sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
bmm2.org/app

#bmm2 #bmm2024 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-

BMM Treasurer - Rajan S Pednekar

20611 Whitebud CT. Tampa FL 33647

Ph- 813-546-1330

Email: Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर:**- $25/ year

Subscription payment is accepted online by Paypal:

https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100

पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50


वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो |
| सचिव: | अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया |
| कोषाध्यक्ष: | राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| सदस्य: | अमर उन्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी |
| | सविता मोरे, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष: | विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय |

**विश्वस्त समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन |
| सदस्य: | नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट |
| प्रकाशक: | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका |



**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक मंडळ | २ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन - अहवाल | ३ |
| वारसा | ४ |
| युवा संपादकीय: २०२३-२४ युवा कमिटी | ५ |
| कविता: मराठी....... | ६ |
| दुःखद निधन (जयश्री हुपरीकर) | ७ |
| कथा लॅन्सींगच्या गणेशोत्सवाची | ७ |
| Lagu Bandhu Jewellers | ९ |
| जाहिरात | ११ |


## संपादक समिती

वृत्त संपादनाची धुरा नवीन संपादक मंडळाने हाती घेतली आहे. नवीन संपादक मंडळाची घडी बसेपर्यंत वृत्तच्या अंकात काही बदल दिसतील. तुमच्या सूचना ईमेलद्वारे जरूर कळवा.



**संपादक समिती**

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
राजन पेडणेकर





# बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनाचा अहवाल

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनात उत्तमोत्तम कार्यक्रमांची रेलचेल!**






या अधिवेशनात आपल्यासाठी चारही दिवशी दर्जेदार आणि भरगच्च अशा कार्यक्रमांची आखणी केली गेली आहे. त्यांची रूपरेषा खालील प्रमाणे!










**उत्तर अमेरिकेतील आणि भारतातील कलाकारांचे कार्यक्रम बघण्यास आपण जरूर या.**

**नाव नोंदणीसाठी आणि अधिक माहितीसाठी:**

https://bmm2024.org/

# बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन प्रकल्प "वारसा", Youtube मालिका

वारसा, जो वडिलोपार्जीत आलेला आणि पुढच्या पिढीला सुपूर्त केलेला असा वारसा. मराठी समाजाने उत्तर अमेरिकेत स्थलांतर करताना बरोबर आणला संस्कृतीचा, शिक्षणाचा, आठवणींचा, आशीर्वादांचा आणि मराठी मातीचा वारसा.

आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचं असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळे रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधलं पाहिजे. त्याची नोंद करून ते जतन केलं पाहिजे. अशा गोष्टी एकत्रित केल्या की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल, त्यासाठी चालू केला आहे हा वारसा प्रकल्प.

**वारसा मालिका भाग 10 वा**

**दुसरा मधुचंद्र .. नवे राज्य, नव्या वाटा**

**श्रीमती मीनाक्षी गोखले,**

**मुंबई ते Berkeley, California १९६२**

**मुंबई ते Elliott Lake, १९६५**



मुंबईतील Atomic energy मध्ये काम करणारे डॉ. सुदर्शन (बापू ) गोखले इ. स. १९६२ साली बर्कले युनिव्हर्सिटीतील सुप्रसिध्द Lawrence Radiation Lab मध्ये संशोधन करण्यासाठी आले. त्यांच्या पत्नी मीनाक्षीताई लगेचच अमेरिकेत आल्या ते मात्र आपल्या दोन लहान मुलींना भारतात सोडूनच. त्यांच्या ह्या दोन वर्षाच्या दीर्घ "दुसऱ्या मधुचंद्राच्या" काळात बर्कले सारख्या सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध अशा गावी त्यांना अनेक नवीन गोष्टी करण्याची, पाहण्याची, शिकण्याची संधी मिळाली. Peace Corp च्या मुलांची मराठी शिक्षिका म्हणून त्यांच्या बरोबर राहून अमेरिकेतील पशुसंवर्धनाची तर ओळख झाली, शिवाय भारतीय कृषी क्रांती मध्ये मीनाताईंनी कळत नकळत योगदान केले. तसेच Julia Child च्या कार्यक्रमा पासून उत्कृष्ट आणि वेगवेगळ्या देशातील स्वयंपाकाची निपुणता सुद्धा मिळवली. Beatles ची "मैफील", प्रसिद्ध Nobel Prize विजेत्यांची भेट, अशा कितीतरी गोष्टीं मुळे मीनाताई, बर्कले च्या आणि अमेरिकेच्या प्रेमात पडल्या.

दोन वर्षांनी गोखले दांपत्य मुंबईला परतले ते उत्तर अमेरिकेत कायमचे जाण्याची स्वप्नं घेऊनच. वर्षभरात संधी मिळाली ती सहकुटुंब कॅनडात जाण्याची. Elliott Lake ह्या ७००० लोकांची वसाहत असलेल्या छोट्याश्या गावात. तिथे जगातील सर्वात मोठ्या Uranium खाणीत बापूंना नोकरी मिळाली. हिवाळ्यात थंडी जोरदार, अगदी minus 40 पर्यंत आणि गाडी झाकून जाईल असा बर्फ. गोखले मुली शाळेत जाऊ लागल्या तर त्याची वर्तमानपत्रात बातमी आली. बर्कले मध्ये मिळालेल्या अनुभवापुढे हा अनुभव अगदीच दुसऱ्या टोकाचा. शेवटी गाशा गुंडाळून कॅनडाला राम राम ठोकला आणि गोखले कुटुंब कायमचे अमेरिकेत स्थलांतरित झाले.

आपण ऐकुया मीनाक्षी गोखल्यांच्या उत्तर अमेरिकेतील स्थलांतराची ही कथा त्यांच्याच कडून वारसा च्या दहाव्या भागात "दुसरा मधुचंद्र .. नवे राज्य, नव्या वाटा "

वारसा मालिकेचा हा अनोखा १० वा भाग 'दुसरा मधुचंद्र .. नवे राज्य, नव्या वाटा' पहाण्यासाठी खालील लिंक क्लिक करा. किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. ह्या Youtube channel ला जरून like आणि subscribe करा.

https://youtu.be/f-VbM2FF1v8

Past Episodes:

https://www.youtube.com/@bmm-varasa

**राशिभविष्य : जानेवारी २०२४**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## युवा संपादकीय: २०२३-२४ युवा कमिटी

नमस्कार,

मी गार्गी सुकुमार बेरी BMM वृत्ताच्या युवा section मध्ये आपल्या सर्व मित्र-मैत्रिणींचे सहर्ष स्वागत करीत आहे. या अंकापासून मी युवा विभागाचे संपादकत्व स्वीकारले आहे. Yuwa committee and I are planning to organize lots of events and initiatives for North American Marathi Youth this year. We're looking forward to connecting with you, आपणा सर्वांना बरोबर घेऊन अनेक कार्यक्रम आपण आयोजित करू आणि यशस्वीरित्या पूर्ण करू, अशी सर्वांकडून अपेक्षा आहे. या वर्षी आपल्या North अमेरिकेतल्या सर्व दहा हजार युवा मंडळींना एकत्र आणण्याचे ध्येय आपल्यासमोर आहे त्यासाठी आपण सर्वजण झटूयात. सर्व युवांना एकत्र आणून "एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ" या उक्तीप्रमाणे, career guidance, college applications, job search अश्या आणि अनेक छोट्या मोठ्या प्रश्नांवर उत्तरे आपण शोधुयात.

Yuwa Committee is working under the guidance of BMM President, Sandeep Dixit and BMM EC Lead and Yuwa coordinator Savita More.

**Sandeep Dixit (BMM President)**



संदीप दीक्षित हे अमोरीकेत गेली तीस वर्षे स्थायिक आहेत. क्लीव्हलँड ओहायो मधील मराठी कम्युनिटीसाठीचे त्यांचे सोशल वर्क गौरवास्पद आहे. त्यांनी सामान्य अमेरीकन आणि मराठी माणूस यांचे मैत्रीपूर्ण संबंध अजून दृढ करण्यासाठी गेले तीन वर्षे वार्षिक योगा महोत्सवाची सुरवात केलेली आहे. आता बृहन्महाराष्ट्र मंडळांची उत्तररंग ही ज्येष्ठ नागरिकांची योजना, सर्व मराठी मंडळापर्यंत कशी पोचवता येईल यावर ते लक्ष केंद्रीत करणार आहेत.

***नोंद:** युवा कार्यकारणीच्या केतकी नाईक (युवा खजिनदार), रेवती आठवले (युवा सोशल मीडिया), गार्गी बेरी (युवा संपादक) यांची ओळख पुढच्या अंकात होईल.*

**Savita More (BMM EC and BMM Yuwa Lead)**



Savita More is part of the BMM EC and BMM Yuwa Lead. She's a mom to two daughters, continues to expand and enrich their experiences as a family by participating and contributing in social, cultural activities every time she gets a chance – be it when they lived in Nashik, Mumbai or now in the United States. She's a montessorian by profession and loves to work with children!

आता २०२३-२४ साठी युवा कार्यकारणी नियुक्त झालेली आहे त्यांचा प्रथम थोडक्यात परिचय करून देत आहे.

BMM युवा कमिटी २०२३-२४

**आरती कारकर, युवा अध्यक्ष**

**(Arti Karkar, Yuwa President)**



आरती महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्क (MMNY) ची सदस्य आहे. ती Mechanical engineer आहे. तिला reading, travelling, photography, trekking आणि नवनवीन creative projects करायची आवड आहे.

तिच्याच शब्दांमध्ये तिचे ध्येय "We want to build a strong foundation for Yuwa and foster even stronger friendships amongst Marathi Yuwa in North America. We are here to Make A Difference, Join Us." आहे.

**आर्या भोईटे, युवा सचिव**

**(Aarya Bhoite, Yuwa Secretary)**



आर्या Seattle महाराष्ट्र मंडळाची सदस्य आहे, आणि ती विद्यार्थिनी आहे. तिचे BMM युवा कार्यकारिणी साठी ध्येय " To ease the college application process for high schoolers and provide them with opportunities to connect with other Marathi American youth "

या कमिटीचे सर्वात मोठे ध्येय हे संपूर्ण उत्तर अमेरिकेतल्या १०००० मराठी युवांना एकत्र जोडणे हे आहे. या सर्व युवांच्यासोबत नवनवीन उपक्रम आयोजित करून एक ताकदवान युवा नेटवर्क निर्माण करायचे आहे. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी आम्ही स्थानिक पातळीवर युवा एकत्रीकरण आयोजित करणार आहोत. यासाठी आपले स्थानिक युवा coordinator लवकरच आपल्याला संपर्क करतील. या ‘एकत्रीकरण’ मध्ये सहभागी होण्यासाठी QR code वर असलेला form भरून युवा नेटवर्क मध्ये सामील व्हा. एवढे लिहून मी माझ्या लेखणीला विराम देते. धन्यवाद.

**श्रीगणेशा करणे**

आपल्या मराठी भाषेमध्ये अत्यंत वैविध्यपूर्ण, अलंकारिक म्हणी आणि वाक्प्रचार आहेत. अश्याच एका छान वाक्प्रचाराने (idiom) आपण या मराठी corner चा "श्रीगणेशा" करत आहोत. गणपतीबाप्पा हा सुखकर्ता, दुःखहर्ता असल्यामुळे कुठल्याही शुभकार्याची सुरुवात त्याची प्रार्थना करून, त्याचे आशीर्वाद घेऊन करतो. म्हणून कुठल्याही चांगल्या कामाची सुरुवात केली – म्हणजेच त्याचा "श्रीगणेशा केला" असे म्हणले जाते.
उदा. : आर्याने तिच्या driving lessons चा आज श्रीगणेशा केला.
चला तर मग, आज आपण कोणकोणत्या कामांचा श्रीगणेशा केला?? आम्हाला social media वर जरूर कळवा.

@bmm_yuwa



## दुःखद निधन

BMMच्या संस्थापिका जयश्री हुपरीकर यांचे नोव्हेंबर ८ ला प्रदीर्घ आजारानंतर दुःखद निधन झाले. जयाताई म्हटले की कोण हे विचारायला लागायचे नाही.



शिकागोच्या मराठी समाजामध्ये जयाताईंचे स्थान विसरता येणार नाही. १९६६ सप्टेंबर मध्ये जयाताई आणि शंकरराव हुपरीकर शिकागोला आले. नंतर जयाताईंनी नॉर्थवेस्टर्न मेडिकल स्कूलच्या research डिपार्टमेंटमध्ये वीस वर्षे नोकरी केली. पण नोकरी करताना देखील, त्यांचे लक्ष होते मराठी मनुष्याकडे आणि मराठी समाजाकडे. शिकागोमध्ये येणाऱ्या नवीन विद्यार्थांसाठी जयाताईंचे घर कायम उघडे असायचे.

शंकरराव हुपरीकर यांनी शिकागोमध्ये केलेली रंगभूमीची सेवा सर्वांनाच माहित आहे. त्यामागे जयाताईंचा भाग किती मोठा आहे हे अनेकांना (शंकररावांच्या नाटकात काम करणारे सोडून) माहित नसेल. जयाताईंनी नाटकात काम पण केले, नाटकात काम करणाऱ्यांची रसनाही तृप्त केली. जयाताईंचे सगळ्यात महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी, शरदराव गोडबोले आणि विष्णु वैद्य ह्या तीनजणांनी केलेली BMM ची स्थापना. आता BMM च्या अधिवेशनाला ४००० पेक्षा अधिक लोक जमतात. १९८४ मध्ये जयाताईंच्या पुढाकाराखाली BMM चे पहिले अधिवेशन शिकागोमध्ये झाले. द. मा. मिरासदार, लक्ष्मण देशपांडे असे पाहुणे होते. आनंदगंधर्व आनंद भाटे हेही तेव्हा, केवळ १० वर्षांचे असताना आले होते.

जयाताईंचे वाचन तर दांडगे होतेच, पण लिखाणही तितकेच दर्जेदार होते! अनेक वर्षे त्यांनी BMM वृत्ताचे संपादकत्व स्वीकारले होते. प्रत्येक संपादकीयाच्या शेवटी त्या सुंदर चार ओळींच्या कविता लिहीत असत. त्यांचे एक पुस्तक 'तूचि शोधूनि पाहे' अगदी सर्वांनी वाचण्यासारखे आहे.

आता शिकागो मंडळाचे जयाताईंच्या निधनाने एक पर्व संपले. BMM चे तिन्ही संस्थापक आता कदाचित परत भेटून एका वेगळ्या जगात मराठी माणसाची परंपरा जागृत ठेवत असतील. आपण त्यांची आठवण जिवंत ठेवूया.

**- रेखा देवधर**

## कथा लॅन्सींगच्या गणेशोत्सवाची

१९९८ च्या फेब्रुवारी महिन्यात आम्ही नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत आलो. कामाची जागा होती लॅन्सींग. लॅन्सींग ही मिशीगनची राजधानी. शाळा कुठे चांगल्या आहेत, मराठी कुटुंबांची वस्ती कुठल्या गावात आहे अशी जुजबी माहिती गोळा करून आम्ही ओकेमॉस गावामध्ये आमचे बस्तान बसवले. लेकीची शाळा सुरु झाली. त्यामुळे काही भारतीय कुटुंबांशी ओळखी झाल्या. त्यांच्याकडून कळले गावात एक देऊळ आहे. तुम्हाला अजून ओळखी करून घ्यायच्या असतील तर रविवारी देवळात जा असा सल्लाही मिळाला.



आपला देश, नातेवाईक, मित्रपरिवार सगळे सोडून इतक्या लांब आल्यावर, आता इथे कसे स्थिरस्थावर होणार अशी मनात चलबिचल चालू असताना, गावात देऊळ आहे ही गोष्ट सुखावून गेली.

लगेचच रविवारी आम्ही देवळात गेलो. नुकतीच बांधकाम पूर्ण झालेली छोटीशी इमारत, त्यात गणपती, शिव परिवार, राम परिवार, राधा कृष्ण, वेंकटेश आणि कार्तिकेय यांच्या सुबक मूर्ती. गावातील भारतीय कुटुंबांच्या अथक परिश्रमातून उभी राहिलेली वास्तू पाहून भारावलेल्या मनस्थितीत घरी परतलो.

त्या वर्षी जून १२-१४ ला देवळात महाप्रतिष्ठापनेचा सोहळा पार पडला. त्या निमित्ताने सुधाकर राव आणि उषा ताई या कुलकर्णी दाम्पत्याची ओळख झाली. १९६० च्या सुमारास बोटींनी अमेरिकेत आलेले सुधाकरराव कालांतराने उषाताईंबरोबर लॅन्सींगमध्ये स्थायिक झाले. गावात देऊळ बांधण्यामध्ये त्या दोघांचा मोठा पुढाकार होता. १९८२ साली त्यांना हवाई मधील सद्गुरु सुब्रामुनीयस्वामी यांनी गणेशाची मूर्ती भेट म्हणून पाठविली आणि कळविले की या मूर्तीची पूजा करायला सुरुवात करा, मंदिराची सोय विघ्नहर्ताच करेल. मूर्ती त्यांच्याकडे पोचली ती सुद्धा संकष्ट चतुर्थीच्या दिवशी! पुढील काही वर्षे त्यांनी या मूर्तीची त्यांच्या घरातच पूजा केली. मंदिरात या गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर दहा दिवस सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची कल्पना उषा ताईंनी पुढे मांडली आणि बाकीच्या मराठी कुटुंबांनी त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उत्सवाच्या पहिल्या दिवशी सर्व

महाराष्ट्रीयन कुटुंबांनी महाप्रसाद बनवायचा, पुढे १० दिवस पूजा आणि विसर्जन असे उत्सवाचे स्वरूप ठरले.



१९९८ चा गणपती येई पर्यंत आमच्या बहुतेक सगळ्या मराठी कुटुंबांबरोबर ओळखी झाल्या. उन्हाळ्याच्या सुट्टीची सुरवात सहलीने करायची असे ठरले. सहलीचा एक भाग म्हणजे दिवसभर मजा करून झाल्यावर संध्याकाळचा चहा आणि गणपती उत्सवाच्या कार्यक्रमाची आखणी. वेगवेगळी कामे लक्षात घेऊन त्याप्रमाणे समित्या करण्याचे ठरविले. गणपतीची आरास, महाप्रसाद, सांस्कृतिक कार्यक्रम, विसर्जन अश्या वेगवेगळ्या समित्यांवर सगळ्यांनी आपापल्या आवडीनुसार नावे नोंदवली. मग काय साऱ्या सुट्टीभर नुसती धमाल. मुलांना एकत्र करून कार्यक्रम बसवणे, महाप्रसाद म्हणून पारंपरिक मराठी जेवण कसे बनवता येईल याच्या चर्चा, आरास काय करायची हे ठरविल्यावर त्यासाठी लागणाऱ्या सामानाची जमवाजमव, अश्या अनेक गोष्टी करण्यात मस्त वेळ गेला. मुलांना तर खूपच मजा आली.

त्याच साली सुरु केलेल्या या गणेशोत्सवाच्या निमित्ताने सगळी मराठी कुटुंबे अजूनच एकमेकांच्या जवळ आली. अगदी घरचे कार्य असल्यासारखे आम्ही सर्वजण उत्सवात भाग घेऊ लागलो. त्यामुळे पहिल्या दिवशीचा महाप्रसाद २०० लोकांपासून ५०० पर्यंत गेला तरी त्याचे कधी दडपण वाटले नाही. गणेशोत्सवात मिशीगन स्टेट युनिव्हर्सिटी मधील विद्यार्थी देखील उत्साहाने सामील होऊ लागले. त्यांच्यासाठी तर दहा दिवस छान छान घरी बनविलेले पदार्थ खायला मिळणे ही एक पर्वणीच होती. गणपतीच्या निमित्ताने खूप स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. मुलांसाठी खेळांच्या स्पर्धा, चित्रकला, गणपती मूर्ती बनविणे, सांस्कृतिक कार्यक्रम अश्या विविध गोष्टी सातत्याने केल्याने तेही गणेशोत्सवाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहू लागले. गणपतीच्या निमित्ताने देवळात रक्तदान शिबीर आयोजित करून मराठी कुटुंबांनी समाज कार्यातही हातभार लावला. आमचा मित्र पुण्य मिश्रा, याने बनवलेला सुंदर गणेश ॲम्बीग्राम, गणपतीसाठी केलेली आरास ट्रक मधून देवळात आणताना पोलिसांनी थांबवून केलेली विचारपूस, दरवर्षी मातीने बनवलेल्या पूजेच्या सुंदर गणेश मूर्ती, मोकाशी मंडळींनी पेणहून आणलेली सुबक उत्सव मूर्ती, विजयराव आणि ज्योत्स्ना ताईंनी गणपतीच्या मिरवणुकीसाठी बनवलेली सुबक पालखी, मध्यरात्री सगळ्यांनी ज्योत्स्नाताईंच्या घरी जमून बनवलेल्या पताका, छोट्या उमाने सगळ्यांना शिकविलेले ओरिगामी मोदक, अमोल खानापूरकरने सुरेल गायलेले 'मिले सुर मेरा तुम्हारा' आणि त्याच्यावर छोट्या मुलांनी केलेला नाच, मिशीगन स्टेट युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसवर काढलेली गणपतीची मिरवणूक, नदीवर जाऊन केलेले गणपतीचे विसर्जन, एक ना अनेक! आम्हां सर्वांच्या असंख्य आठवणी देवळातील गणेशोत्सवाशी निगडीत आहेत. आजही सगळे एकत्र आले की गणपतीत केलेल्या मजेची आठवण निघतेच. खरंतर देवळातील गणपती उत्सव हा सर्व मराठी कुटुंबांना जुळवणारा एक मोठा दुवा आहे!

सध्या गावात बरीच नवीन मराठी कुटुंबे आहेत, त्याबरोबरच छोट्या मुलांची एक नवीन पिढी! काही उत्साही मंडळी मराठी शाळा चालवतात. २०१८ साली आम्ही मिड-मिशीगन महाराष्ट्र मंडळ स्थापन केले. आता आम्ही देवळातील गणपती उत्सव महाराष्ट्र मंडळातर्फे आयोजित करतो. अगदी उकडीच्या मोदकांचा नैवेद्य पासून पहिली पूजा करून, दहीभाताच्या शिदोरीनी विसर्जन करेपर्यंत, तीच धामधूम, तोच उत्साह!

या वर्षी आम्ही देवळात पंचविसावा सार्वजनिक गणपती उत्सव साजरा केला. सालाबाद प्रमाणे दहा दिवसात समस्त भारतीय कुटुंबांनी गणपतीच्या पूजेत सहभाग घेतला. डेट्रॉईट हून बोलावलेल्या शिवशार्दूल पथकाने जवळ जवळ एक तास मस्त ढोल-ताशा वाजवला. ढोल ताशाच्या तालावर केवळ भारतीयच नाही तर काही अमेरिकन लोकही आमच्या बरोबर फेर धरून नाचले! अवघा रंग एकचि झाला याची अनुभूती याहून वेगळी, ती काय असणार!

आमच्या आधीच्या पिढीकडून घेतलेला हा वसा पुढच्या पिढीच्या हातात देताना माझे मन म्हणत राहते 'उतू नका मातू नका, घेतला वसा टाकू नका' आणि नवीन पिढीचा उत्साह पाहता एक अव्यक्त विश्वास साद देतो 'उतणार नाही मातणार नाही घेतला वसा टाकणार नाही'!

गणपती बाप्पा मोरया! तुमची अशीच कृपादृष्टी राहू दे आम्हा सर्वांवर!

**- सौ. मानसी उपाध्ये**

## Lagu Bandhu Jewellers – Exquisite World of Timeless Gemstones

With the finest craftsmanship and expertise, Lagu Bandhu has established supremacy in creating timeless jewellery. It's precious gemstone collection is a crucial part of it's unparalleled legacy. Every gemstone here is not a mere piece of adornment but pride in itself. With incredible jewellery crafting and authenticity, the brand stands out of the competition uniquely. By making numerous customers happy in the last 86+ years, Lagu Bandhu is known for it's high-reliability.

**Wedding Special Gemstone Jewellery:**

Every bride desires to look her best-self on her wedding day. Lagu Bandhu ensures that you receive nothing but perfection. The meticulously crafted gemstone jewellery here, guarantees to enhance your elegance and beauty. Each gem is finely curated for your satisfaction. Over the span of years, their work has become an integral part of life for many people today. With custom-made jewellery service, Lagu Bandhu continues to win hearts of it's diverse customers.

**Precious Gemstones at Lagu Bandhu:**

From unique types of uncut gems to beautifully shaped cut gems, Lagu Bandhu owns an exquisite gemstone collection. Some of these include – the king of all gems 'Diamond', the beautiful green 'Emerald', the rich 'Blue Sapphire', the shiny 'Yellow Sapphire', the red colored 'Ruby', and delicate 'Pearls'.

With each of these precious gems, the brand brings sparkle in all seasons. It's assured originality and flawless beauty are most admired by those who value gemstones. Each piece tells it's own majestic story. These fine pieces of art are not mere ornaments, but a pure delight, when worn.

**Store and Care Instructions:**

Proper care of jewellery is no more a difficult task. However, one must follow the necessary steps to maintain it's shine and safety. Most jewellery requires mild soap or detergent. Diamonds can even be boiled for 2 to 5 minutes before gentle brushing under tap water. The delicate pearls and corals must only be cleaned with a soft and damp cloth. Every type of jewellery should be stored separately to avoid scratches. Whether it's crystalline or delicate gems, the right care ensures the radiance of your jewellery stays for many years ahead.

In this world of endless options, Lagu Bandhu is recognized as a choice for trust. They believe in creating magic that enchants your wedding and every special look. With passion, the brand has achieved tremendous success while holding it's roots strongly. After all, Lagu Bandhu is not just a jeweller, but a bestowal for life.






• Insured Door Delivery: **FedEx | UPS | DHL** • Item selection: call **+91 84240 60760**
For more details regarding payment option: +91 98201 11741 (Dilip Lagu) | +91 95940 31181 (Dhiraj)
www.lagubandhu.in |
Yadnya

**NAMASKAR**

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

**Join Donor List:**

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**


बृहन्महाराष्ट्र मंडळ

## Reshimgathee



नाते जुळते मनाशी मनाचे



A BMM Matrimonial initiative for Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/



BMM मराठी शाळा

Five-level "Marathi Language Learning" progressive curriculum, study guidelines and supporting materials.

The BMM-Bharti Vidyapeeth's joint certificates for "Marathi Bhasha" examinations after successful completion of each level and passing criteria.

For BMM Marathi Shala inquiries
Email : Shala@bmmonline.org

https://bmmshala.net/


## भगवान श्रीकृष्ण यांची पत्रिका, एक कृष्ण स्तुती

ज्योतिष हे एक वेदांग आहे, ते वैदिक काळापासून चालत आलेले ज्ञान आहे आणि आपल्या संस्कृतीचा वारसा आहे. कृष्ण आणि राम - दोघे विष्णूचेच अवतार आहेत, पण दोघांच्या वागण्यात आणि जीवनात खूपच फरक आहे.


विष्णूचे अवतार अभिजीत मुहूर्तावर आहेत. रामाचा जन्म दुपारी १२ वाजता सूर्य डोक्यावर असताना, तर कृष्णाचा रात्री १२ वाजता, सूर्य पायाखाली किंवा १८० अंश दूर असताना आहे. सत्य युगातील राम आणि त्रेता आणि द्वापार युगातले कृष्ण. आदर्श राम एक वचनी, एक पत्नीव्रती होते, तर कृष्ण वेळ प्रसंगी खोटे बोलणारा, अनेक बायका असलेला आणि शिष्टाई करताना कृष्ण नीती सुद्धा वापरणारा होता.

कृष्णाच्या पत्रिकेवरून त्याच्या आयुष्याची झलक सांगता येईल का? त्याच्या जीवनातील घटना आणि त्याच्या स्वभावाचे वर्णन पत्रिकेवरून करण्याचा हा माझा छोटासा प्रयत्न.

**<u>घर व स्थान</u>**




**<u>राशी आणि ग्रह</u>**




**जन्म पत्रिका म्हणजे काय ?**


पत्रिकेत १२ घरे असतात आणि त्यांचे स्थान ठरलेले असते. राशी १२ असून त्यांचे स्थान बदलते. त्यांचे स्थान पत्रिकेत त्यांचा क्रम टाकून लिहितात.

प्रत्येक राशीचा स्वामी - एक ग्रह असतो. प्रत्येक घर अमुक गोष्टी निदर्शते. पाचवे घर आईचे, पहिले स्वतःचे, सातवे बायकोचे – काही ग्रह मित्र तर काही शत्रू. शनी, राहू, केतू आणि मंगळ यांना पाप ग्रह म्हणततात.

भारतीय पद्धतीनुसार जन्माच्यावेळी चंद्र ज्या राशीत असतो ती रास. पहिल्या घराला लग्न स्थान पण म्हणतात. लग्नेश म्हणजे पहिल्या घरातील असलेल्या राशीचा स्वामी. कृष्णाच्या पत्रिकेत पहिल्या घरात वृषभ राशी आहे. शुक्र वृषभ राशीचा स्वामी आहे. म्हणून शुक्र लग्नेश आहे. अष्टमीला चंद्र १५ दिवसाच्या अर्धा भ्रमणात अर्धा असतो.

अष्टमीला चंद्र अर्धा गोरा आणी अर्धा काळा असतो. मंगळाचे स्वगृह मेष आणि वृश्चिक रास. मंगळ मकरेत उच्च म्हणजे शक्तिमान होतो तर कर्केत नीच असतो.

**कृष्णाची कुंडली - दोन वेगळ्या सौरसेस मधून घेतली**


भगवान श्रीकृष्ण की जन्म कुंडली



श्रीशुभ संवति ईश्वरे नाम्नि द्वापरार्धे 863874 शेष 125 श्रीमुख संवत्सरे श्रीसूर्ये दक्षिणायने वर्षाऋतौ भाद्रपदे मासि कृष्ण पक्षे अष्टम्यां घटी 56 पल 45 बुधवासरे रोहिणी नक्षत्रे घटी 28 पल 0 हर्षणयोगे घटी 41 पल 37 कौलव करणे इष्टं घटी 46 पल 14 एतत्समये चन्द्रवंशांतःपाति वैश्यवंशावतंस गरुगोब्राह्मणसेवापरायण श्रीमत्पर्जन्यात्मज

**जन्म वर्ष:**

३२५१ बी सी ही पहिली तारीख जास्त बारोबर असावी असे संशोधक म्हणतात. काही धार्मिक ग्रंथ, २१ जुलै ३२२८ बी सी ही तारीख मानतात. ही जन्मवेळ तारीख हरी वंश पुराण, सूरदास, भागवत पुराण, या पौराणिक ग्रंथात मिळते.

जन्माष्टमीला श्रावण महिन्यात अभिजीत झीनिथ (zenith ) मुहूर्त रात्री १२ वाजता मथुरेच्या कारागृहात कृष्णजन्म झाला.

भगवान अवतार घेतात, तेंव्हा एक सुंदर मुहूर्त बघून आणि ग्रह, राशी व नक्षत्र चे उत्तम योग साधून घेतात. नवग्रह हे विष्णूचेच रूप आहे असे बरेच लोक मानतात आणि अवतार घेताना ते (विष्णू) मुद्दाम उत्तम ग्रहांचे योग साधतात. दोन्ही अवतारात विष्णूच्या जन्माचा मुहूर्त अभिजीत मुहूर्त होता. श्रीराम दुपारी बारा वाजता सूर्य डोक्यावर असताना जन्मले आणि श्रीकृष्ण रात्री बारा वाजता, सूर्य पायाखाली असताना जन्मले. भगवंतांच्या कुंडलीत तीन उच्च ग्रह आहेत, आणी चार स्वगृहीचे ग्रह आहेत.

त्यांचा जन्म आणि चंद्र नक्षत्र रोहिणी आहे. त्या नक्षत्रा मुळे श्री कृष्णाला अलौकिक वाक माधुर्य लाभले. ते अतिशय गोड बोले होते अशी भागवतात नोंद आहे. चंद्र उच्चीचा आणि लग्नात असल्यामुळे त्यांचा चेहरा खूपच बालिश, मिश्किल आणि लाघवी होता, त्यांचे डोळे सुंदर मोठे होते.

पत्रिकेत चंद्र, सूर्य, शुक्र केंद्रात आणि मंगळ, बुध, गुरू त्रिकोण स्थानी आहेत.

**आता आपण पत्रिकेतल्या स्थानां प्रमाणे स्वभाव बघुया.**

**लग्न स्थान**: शारीरिक स्वास्थ्य, व्यक्तित्त्व, समाजात प्रतिष्ठा दर्शविते: (कुंडलीत २ लिहिले आहे ते लग्नस्थान. लग्नात दुसरी राशी वृषभ आहे म्हणून २ आकडा.) लग्नेश शुक्र वृषभ स्वामी, स्वगृही तुळेत आहे. त्या मूळे कृष्णाच्या आयुष्याची दोरी बळकट होती आणि सुंदर स्वास्थ्य होते. कंसाला मल्ल युद्धात मात करण्याइतकी अचाट शक्ती त्यांत होती. १२० वर्षाचे आयुष्य लाभले. लग्नात चंद्र उच्चीचा आणि शुक्र स्वगृह असल्यामुळे त्यांना फारच सुदृढ शरीर यष्टी लाभली.

**द्वितीय स्थान**: धन संपत्ती चे स्थान (कुंडलीत ३ लिहिले आहे ते) त्या वर उच्च शनीची नववी दृष्टी (शनी ग्रहास ३ दृष्टी असतात, ३, ७, १०). भरपूर धन धान्य व मालमत्ता, स्थावरजंग आणि भरपूर मोठे असे त्यांचे राज्य होतें.

**तृतीय स्थान:** स्वामी, भावेश उच्च चंद्र आहे. त्या घरावर उच्च मंगळाची (मंगळास ३ दृष्टी असतात ४,७,८) व उच्च गुरूची दृष्टी (गुरूस तीन दृष्टी असतात (५,७,९), या सर्वांमुळे बलरामासारखा बलशाली बंधू आणि सुभद्रा आणि द्रौपदी सारख्या उत्तम बहिणी मिळाल्या. सुदामा आणि अनेक गोपाळ मित्र मिळाले.

**चतुर्थ स्थानी** स्वगृहीचा रवि (सिंह राशीचा). यशोदे सारखी उत्तम माता जिने बाल कृष्णाच्या मुखी ब्रम्हांड पाहिले. ते रूप बघण्याची सात्विकता त्या मातेत होती. यशोदा मातेने केलेले उत्तम संस्कार जीवन भर बाल कृष्णास लाभले आणि एक आदर्श उदाहरण त्यांनी प्रजे पुढे मांडले.

चतुर्थातील रवी वरील मंगळाची आठवी दृष्टी, देवकी मातेस कारावासात बंदिस्त करते.

**पंचम स्थानी** स्वगृहीचा बुध, उत्तम बुद्धी देतो, बरीच उच्च दर्जाची अपत्य देतो.

**षष्ठ स्थानी** शुक्र आणि शनी आहेत, त्यामुळे त्यांना अनेक शत्रू होते (कौरव, शिशुपाल, रुक्मी, कौंस) आणि जीवनात अनेक लढाया झाल्या. अनेक वेळा त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न झाला (पूतना मावशी, कालिया सर्प, बकासूर, अधासूर, बाणासूर, जरासंध, शल्व, नरकासूर इत्यादी). त्याचप्रमाणे इंद्राच्या कोपाने झालेली अतिवृष्टी ज्याच्यामुळे गोवर्धन पर्वत त्यांना उचलावा लागला. असल्या बऱ्याच वेदना त्यांनी जीवनात सोसल्या.

**सप्तम स्थानावर** आणि सप्तमेशावर चंद्राचं प्रभुत्व असल्यामुळे त्यांना अनेक बायका होत्या. राण्यांचे प्रेम आणि त्यांच्यावर देवाचे प्रेम दर्शविते. गोपी, राधा या देवोत्तम बालिका व त्यांच्या सोबत केलेला स्वर्गीय रास गीतगोविंदात अजरामर झाला. सर्व कवी, कीर्तनकार, इतिहासकार, ज्योतिष या प्रेमाने भारावून त्यांना वंदन करतात आणि त्यातून करोडो पंगत्यांचे काव्य घडते.

राहू सप्तम स्थानी असल्या मुळे बऱ्याच बायका स्त्रिया तुरुंगातून मुक्त केल्या, काही अपहरण करून आणल्या उदाहरणार्थ रुक्मिणी हरण.

**अष्टम स्थान** मृत्यूचे, अष्टमेष गुरू उच्च आहे: शनीची तिसरी दृष्टि. यामुळे भगवंतांनी मृत्यूवर विजय मिळवला होता. संपूर्ण १२० वर्षाच्या महादशा संपल्या तेंव्हा अवतार आटोपण्याचा हा एक मार्ग त्यांनी निवडला. त्यांनी रुद्राक्ष वनात दोन खोडांन मध्ये बसून सर्व अंग झाकले होते पण फक्त आपला कोवळा अंगठा मुद्दाम बाहेर ठेवला. व्याधानें हरीण समजून मारलेल्या बाणाने त्यांना मृत्यू आला.

**नवं स्थान** धर्माचे आणि त्यात मंगळ आहे. त्यामुळे कृष्णाच्या जीवनात खूप युद्ध झाली आणि धर्माचे पालन करण्यास धर्मयुद्ध ही झाले.

**आता ग्रह बघुया:**

**चंद्र:** पत्रिकेतला अष्टमीचा चंद्र, अर्धा शुक्ला अर्धा कृष्ण असतो. कृष्णा चंद्र आणि आणि केतूच्या संगन्मतात आहे. त्यामुळे बरीच कृष्णा कृत्ये झालीत. त्यात भर आहे शुक्र शनी या दोन दैत्यांची युती.

या दोन ग्रहांनी कहर केला पण यामुळे भगवान सर्व शत्रू ना पुरून उरले.

**मंगळ:** मंगळ उच्चिचा आणि त्रिकोणात (५,९ स्थान) आहे, त्या मूळे जन्मभर शक्ती शाली बलरामाचा साथ मिळाला. मंगळ म्हणजे मामा आणि त्याच्याशी वैर दर्शविते. मंगळ म्हणजे कारावास, बंदिवास. देवकीस हे सहन करावे लागले.

**गुरू:** गुरू स्वगृहीचा, प्रभावशाली तल्लख बुद्धी देतो. भाषांवर प्रभुत्व, ज्ञान, गुरू शिक्षक स्वगृहीचा गुरू, उच्च नैतिक पातळी दर्शवतो. गुरू स्वगृही ११व्या स्थानी आहे. हा धनेश, भरपूर संपत्ती देतो आणि समृध्द करतो, कृष्ण श्रीमंत होते. गुरुची पाचवी दृष्टी तृतीय स्थानावर आहे. ती दृष्टि कृष्णाला खूप बंधू भगिनी प्रेम मिळवून देते. गुरूची सप्तम दृष्टी पंचमस्तानावर असल्यामुळे त्यांना भरपूर संतती होती आणि ती पराक्रमी होती. गुरूची नवं दृष्टी सप्तम स्थानावर आहे, त्यामुळे त्यांना बऱ्याच भार्या म्हणजे १६ सहस्त्रहून अधिक स्त्रिया होत्या.

**रवी:** रवी स्वगृही सिंह राशीत चतुर्थात म्हणजे केंद्रात (१,४,७,१० स्थान) आहे. आई यशोदा बरोबर उत्तम नाते आणि जागतीक कीर्ती लाभली.

**शनी:** उच्चीचा शनी प्रजेचा कारक आहे. त्यामुळे संपूर्ण मथुरा त्यांनी सांगितल्यावर ताबडतोब द्वारकेला गेली. या शिवाय शनीने धोरणी बनवले. कर्णाकडे अर्जुनाचा नाश करायला दोन मोठ्या शक्ती होत्या. ज्यांना सामोरे जायला अर्जुनाकडे काही तोड नव्हती. घटोत्कच युद्धात आल्यावर, कृष्णाने त्यास दुर्योधनावर सोडला. कर्ण मित्राला वाचवायला धाऊन आला आणि एक शक्ती त्याला घटोत्कचावर वापरावी लागली. आता एकच उरली आणि ती वापरली त्या वेळेस कृष्णाने रथ जमिनीपासून उचलला आणि अर्जुनाला वाचवले.

**बुध:** बुध बुद्धीचा कारक आहे आणि पंचम आणि द्वितीय स्थानाचा स्वामी बुध, द्वितीय स्थान वाणी चे कारक आहे. भगवंतांचे गीतेचे माधुर्य बुद्ध मुळे आहे.

कृष्णाच्या जीवनातल्या महादशा रोहिणी नक्षत्र पासून सुरु झाल्या व संपूर्ण १२० वर्ष चालल्या. परंतु प्रत्येक दशेत घडलेल्या घटना हा एक वेगळा विषय होईल. हे वाचल्या बद्दल धन्यवाद.

**- अजय तनखीवाले**

## तुळशीचं लग्न- A Divine Anniversary Celebration @कँटन मराठी शाळा

दसरा-दिवाळी धुमधडाक्यात साजरी केल्यानंतर कँटन मराठी शाळेमधे एका खास लग्नाची चर्चा चालू झाली. सर्व शिक्षकांच्या एकाच meeting मधे १९ नोव्हेंबर २०२३ चा मुहूर्त ठरला पण! आणि तुळशीच्या लग्नाची एकच लगबग चालू झाली. तुळस आणि कृष्णरूपी विष्णू यांचा विवाह थाटामाटात साजरा करायचं planning चालू झालं. एकच ध्यास होता की आपल्या मुलांसाठी इथे सातासमुद्रापार तुळशीच्या लग्नाचा सोहळा उभा करायचा, अगदी आपण आपल्या लहानपणी आजी-आजोबांकडे साजरा केला तस्सा किंवा त्याहून सरस.




सर्व पालकांना Whatsapp वर एक खास पत्रिका पाठवून आग्रहाचं आमंत्रण देण्यात आले आणि पंगतीला फराळाचा menu ठरवून, पालक-शिक्षकांच्या Team ने जबाबदारी वाटून घेतली. लग्नसोहळ्याची, पूजेची जय्यत तयारी केली होती. कँटन शाळेचा हॉल, झेंडूच्या माळा, वृंदावन, पणत्यांनी सुंदर सजवला होता.

सगळं वऱ्हाड जमल्यावर जोगदेव आज्जींनी बच्चेकंपनीला वृंदा, जालंधर आणि विष्णू-महेशाची गोष्ट सांगितली. जालंधर-महेशाच्या युद्धामधे विष्णूंनी युक्ती करून वृंदेला कसं गुंतवून ठेवलं, मग वृंदेनी विष्णूला शाळिग्राम बनून युगानुयुगे नदीत पडून राहायचा शाप दिला आणि विष्णूंनी कृष्णरूपात जन्म घेऊन कसं त्यांचं वृंदेशी म्हणजे तुळशीशी लग्नाचं वचन पूर्ण केलं ह्याची रंजक कहाणी मुलांनाच काय पण जमलेल्या पालकांना पण आवडली. वृंदावन मधील वृंदा कोण हा लहानपणापासून पडलेला एक प्रश्न सुटला. आज आपण ह्या तुळशी-कृष्णचा विवाह समारंभ recreate करून, त्यांची Wedding Anniversary साजरी करणार आहोत, हे कळल्यावर छोट्या वऱ्हाड-मंडळींना पण एकदम ohh! झालं आणि सगळ्यांनी आनंदाने टाळ्या पिटल्या.

चि. सौ. कां. तुलसी म्हणजेच वृंदा, म्हणजे आमची नवरी मुलगी खास काठापदराची साडी नेसून, दागिन्यांनी मढून लग्नासाठी सजून तयार झाली होती, आणि कृष्णरूपी विष्णू युगायुगाची साथ देण्यासाठी अंतरपाटाच्या पलीकडे सज्ज झाला होता. ऊस मामा पण वृंदा मागून तिची पाठवणी करायला सज्ज झाले होते.

वाजंत्री आणि मंगलाष्टकांच्या गजरामध्ये एकच गलबला झाला आणि अंतरपाट सारून वृंदा/तुळशीचे लग्न कृष्णाशी थाटामाटात पार पडलं. सर्व वऱ्हाड मंडळींनी मग लाडू, चकल्या, शंकरपाळ्यांवर ताव मारला आणि नवदांपत्याला शुभेच्छा देत एकमेकांचा निरोप घेतला. सर्व शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचं सार्थक झालं जेंव्हा जाताना विद्यार्थी, पालक सांगत होते की पुढच्या वर्षी आपण तुळशी-कृष्णाची Anniversary परत नक्की celebrate करू.

**अभिजीत जोगदेव - डेट्रॉईट, मिशिगन**



Canton Shala Teachers (From Left) Bhavana Nalawade, Surekha Patil, Smita Atre,Abhijit Jogdeo, Girija Deodhar, Radhika Dravid, Madhura Damle, Rashmi Kuralkar.



मराठी शाळा डेट्रोईट इथे १९ नोव्हेंबर १०२३ या दिवशी दिवाळीनिमित्त 'तुळशीचे लग्न' या कार्यक्रमाला हजर राहण्याचा आणि बालमित्रांना तुळशीच्या लग्नाची गोष्ट सांगण्याचाही योग आला यामुळे खूप आनंद झाला. या कार्यक्रमामुळे आम्ही दोघे आजी आजोबा खूपच भारावून गेलो. भारतातून इथे अमेरिकेत येऊन मराठी शाळा चालवणे आणि आपल्या संस्कृतीबद्दलचे, सणांचे समारंभ करणे ही खरोखरच कौतुकास्पद गोष्ट आहे. तुळशीच्या लग्नाच्या वेळेस केलेली सगळी तयारी खूपच अप्रतिम होती. लग्नपत्रिका, नटवलेला गोपाळकृष्ण, साडी नेसवलेली तुळस, तुळशी वृंदावन, लग्नाच्या वेळेस लागणारी फळे, ओटी, मंगळसूत्र, मुंडावळ्या, अंतरपाट , चौरंग अशा अनेक बारीक-सारीक गोष्टी यामध्ये समाविष्ट होत्या. सनईची बॅकग्राऊंड, मंगलाष्टक आणि त्यानंतर सर्वांना दिवाळी फराळ! वा!! मस्तच सादरीकरण! लग्न समारंभ फारच उत्कृष्ट झाला. सगळ्या कार्यक्रमाचे श्रेय मराठी शाळा चालवणारे Bhavana Nalawade, Surekha Patil, Smita Atre, Abhijit Jogdeo, Girija Deodhar, Radhika Dravid, Madhura Damle, Rashmi Kuralkar. यांना आहे. अशीच त्यांनी सगळ्यांनी भारतीय संस्कृती जपावी आणि बालचमूची मराठीची आवड वाढवावी असा आशीर्वाद आजी आजोबांकडून.

**- स्वाती जोगदेव व विलास जोगदेव (आजी -आजोबा)**

## पिट्सबर्ग मधील मातृभोजन २०२४

आजकाल अनेक मराठी कुटुंबातील मुलांचे परदेशात उच्च शिक्षणासाठी जाण्याचं प्रमाण वाढलं आहे. आपल्या मातृभूमीपासून दूर अनोळखी शहरात शिक्षणाच्या निमित्ताने आलेल्या मराठी मुलांना दिवाळी साजरी करताना घराची, आईची आठवण नक्कीच येत असेल. त्यांना इथे फराळ, गोडाधोडाचे, सणाचं जेवण मिळत असेल का? अमेरिकेतील पिट्स्बर्ग सारख्या थंड प्रदेशातील शहरात स्वतःची गाडी असणे ही मूलभूत गरज असते. एकतर खिशात पैसे नाही की फिरायला गाडी नाही. दिवाळीच्या दिवशी सुद्धा आपली ही मराठी मुलं पिझ्झा आणि नूडल खाऊन झोपत असतील का? असा विचार मनात येऊन पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये, आपण यांच्यासाठी काहीतरी करावे, अशी भावना निर्माण झाली. त्यातूनच मातृभोजन या कार्यक्रमाची संकल्पना अस्तित्वात आली.

सर्वांनी ठरवले की आता या मराठी मुलांना परदेशात सुद्धा आपल्या हक्काच मराठी कुटुंब मिळेल. शिक्षणासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या मराठी मुलांची दिवाळी साजरी होणार, आता त्यांच्या पिट्सबर्ग मधील मराठी कुटुंबासमवेत. आपलं गाव सोडून परदेशी आलेल्या आपल्या सर्वांनाच आणि विशेषतः गावात नव्याने आलेल्या तरुण विद्यार्थ्यांना आपल्या घराची आठवण नेहमीच येत असते. त्यातही दिवाळी-गणपती अशा सणासुदीच्या दिवशी 'आपण घरी नाही' ही जाणीव त्यांना अधिकच बोचत असणार. त्यांची ही एकाकीपणाची बोच थोडी हलकी करण्यासाठी आमच्या गावात शिकायला आलेल्या विद्यार्थ्यांना इथे कायमस्वरूपी राहणाऱ्या लोकांनी जेवायला घरी बोलवावं आणि त्यांच्याशी गप्पा-टप्पा कराव्या, दृढ ओळखी करून घ्याव्यात अशी कल्पना 'मातृभोजन' ह्या संकल्पनेच्या मागे आहे.

मंडळाच्या सभासदांनी ही संकल्पना डोक्यावर घेतली. या अभिनव कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठामध्ये शिकणाऱ्या २० विद्यार्थी आणि १० मराठी कुटुंबे यांच्यासमवेत केली. यातील निवडक कुटुंबाच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया जशाच्या तशा खालील लेखात सचित्र देत आहोत. नक्की आस्वाद घ्या आणि आपली प्रतिक्रिया नक्की कळवा. **पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळ**, कार्यकारिणी २०२३-२४ ई-मेल : [mmpgh.2024@gmail.com](mailto:mmpgh.2024@gmail.com)



काल संध्याकाळी आमच्या घरी श्री. जय पात्रीकर आणि श्री. तेजस सरवणकर असे दोन तरुण विद्यार्थी मातृभोजनासाठी आले होते. दोन अतिशय हुशार आणि नम्र तरुणांची आणि आमची काल भेट झाली. जय इथल्या सुप्रसिद्ध कार्नेगी मेलन युनिव्हर्सिटीत त्यांच्या जगप्रसिद्ध रोबोटिक्स इन्स्टिट्यूटमध्ये पीएचडी करत आहे. तो ड्रोन टेक्नॉलॉजीवर काम करतो. शिवाय तो स्वतःही वैमानिक आहे! तेजस सुद्धा कार्नेगी मेलन युनिव्हर्सिटीतून ह्युमन-कम्प्युटर इंटरॅक्शन इन्स्टिट्यूटमधून नुकताच मास्टर्स झाला आहे आणि आता नोकरी करतो आहे. तेजस बीएमएमच्या युवा समितीवर काम करतो. दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेत घेत आमच्या गप्पा मस्त रंगल्या. त्यानंतर सौ.अनघाने केलेल्या श्रीखंड, मसालेभात, भाजी-पोळी, वांग्याचं भरीत ह्यांचा

आस्वाद घेत साग्रसंगीत जेवण झालं. अनघाच्या हातचं सुग्रास जेवण मुखी पडल्याने मातृभोजनाचा, मायेचा घास त्यांच्या मुखी पडला. त्याचबरोबर आमची मुलं मोठी होऊन आता बाहेरगावी नोकरीधंद्यासाठी गेली आहेत. त्यामुळे जय आणि तेजस ही तरुण मुलं आमच्या घरी आली आणि आमचीच मुलं आम्हाला भेटल्याचा आनंद आम्हाला झाला. हीच खरी "विन - विन सिच्युएशन", नाही का?

**सौ अनघा आणि श्री प्रियदर्शन मनोहर**



मंडळाने आयोजित केलेल्या मातृभोजन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून CMU विद्यापीठातील विद्यार्थिनी कुमारी संपदा आचार्य हिचा पाहुणचार करताना आम्हाला खूप आनंद झाला. आमची संध्याकाळ, गप्पा आणि फराळामध्ये अगदी सुखद गेली. संपदाने देखील सुग्रास रव्याचे लाडू बनवून आणले होते. जानेवारीमध्ये पुन्हा एकदा संपदाच्या मैत्रिणीसोबत भेटण्याचा कार्यक्रम निश्चित करून आम्ही संपदाला निरोप दिला.

**सौ. लक्ष्मी आणि श्री. सचिन वेलणकर**



काल मातृभोजनाच्या निमित्ताने चेतन पठाडे आणि भावेश ढाके यांचा पाहुणचार करताना आम्हाला खूप आनंद झाला. दोघेही सीएमयू मधून इन्फॉर्मेशन सिक्युरिटी मध्ये मास्टर करत आहेत. त्यांच्यासाठी आम्ही साधे महाराष्ट्रीय जेवण बनवले होते. अमेरिका आणि भारत यामधील जीवनशैली, करिअरच्या निवडी, संधी आणि इतर मनोरंजक विषयांबाबत आम्ही दोघांसोबत केलेल्या संभाषणाचा आनंद घेतला. महाराष्ट्र मंडळाचा एक अप्रतिम उपक्रम आहे आणि आम्ही आशा करतो की पुढे जाऊन, तो वार्षिक उपक्रम होईल.

**सौ. प्रीती आणि श्री. राजेश पोतदार**

मातृभोजन कार्यक्रम अप्रतिमपणे आयोजित करण्यात आला होता! पिट्सबर्ग येथील महाराष्ट्र मंडळाने आमच्यासाठी हा अनपेक्षित सुखद अनुभव आयोजित केला. रात्रीच्या जेवणासाठी महाराष्ट्रीयन कुटुंबाला भेट देणे खरोखरच आनंददायी आणि हृदयस्पर्शी होते. त्यांच्या आदरातिथ्यामुळे आम्हाला घरच्या सारखे वाटले. मी आणि भावेशने, पोतदार कुटुंबाला (प्रीती मावशी, राजेश काका, इशू आणि पेनी) मातृभोजनासाठी भेट दिली.

**चेतन पठाडे व भावेश ढाके**



मंडळाच्या कार्यक्रमांतर्गत आमच्याकडे ऐश्वर्या राणे आणि गौरी दळवणकर आल्या होत्या. या सीएमयू मधील दोन्ही पदवीधर विद्यार्थिनी आमच्याकडे मातृभोजनाच्या निमित्ताने आल्या होत्या. आम्ही चहा, दिवाळी फराळ आणि गप्पांचा आस्वाद घेतला. रात्रीचे जेवण पारंपारिक होते - पोळी, बटाटा भाजी, श्रीखंड. यूएसमध्ये अभ्यास आणि राहणे, नोकरीच्या संधी आणि इतर विषयांबद्दल त्यांच्याशी गप्पा मारण्याचा आनंद घेतला. मंडळाचा उत्तम उपक्रम!

**सौ. मिता आणि श्री. तुषार लोवलेकर**



रविवारी 'मातृभोजन'साठी सीएमयूच्या विद्यार्थी साक्षी जिल्हेवार आणि सौम्या शिखा यांचा पाहुणचार करताना राजन आणि मला आनंद झाला! त्यांची जिज्ञासा, धाडसी वृत्ती, तयारी आणि इथल्या जीवनाशी जुळवून घेण्याची त्यांची गती पाहून, आम्ही प्रभावित झालो! आधुनिक भारताबद्दल त्यांचा अभिप्राय ऐकून आम्ही हर्षावून गेलो!! त्यांना घरचे जेवण केशर श्रीखंड, मसालेदार चटण्या, लोणचे आणि दिवाळी फराळ खूप आवडला. अंजली आणि नीरज मेढेकर आमच्यात सामील झाले. मुलींसाठी ते एक गोड सरप्राईज होते!! या उपक्रमाबद्दल धन्यवाद, आम्हाला भविष्यात उपक्रमात स्वयंसेवक म्हणून भाग घ्यायला नक्कीच आवडेल!!

**सौ. वृषाली आणि श्री. राजन जोशी**



आमचे विद्यार्थी पाहुणे, चिदविलास आणि त्यांची पत्नी सुरभी यांनी काल आम्हाला भेट दिली. त्या दोघांनी ड्युकेस्ने विद्यापीठाच्या सॉफ्टवेअर अभियांत्रिकी कार्यक्रमात मास्टर्समध्ये प्रवेश घेतला आहे. अतिशय गोड जोडपे! आम्हाला त्यांच्याशी संवाद साधताना खूप आनंद झाला. आमच्यामध्ये खूप सामायिक आवडी होत्या. माझ्याप्रमाणेच सुरभीला नृत्याची आवड आहे. तिने आम्हाला तिच्या इन्स्टाग्रामवर काही डान्सिंग पोस्ट दाखवल्या. माझ्या मागील काही

व्हिडिओचा आनंद घेतला. चिदविलास हा आमच्यासारखाच चित्रपटप्रेमी आणि बॉलीवूडचा विश्वकोश आहे आणि आमच्या छान गप्पा रंगल्या. खूप आनंदी, स्ट्रीट स्मार्ट आणि जीवनाने परिपूर्ण अशा सुरभीने तिच्या पालकांना विडिओ कॉल केला, आणि मला त्यांच्याशी गप्पा मारण्यात आनंद झाला. आम्ही त्यांना धीर दिला की तिला आता येथे एक मावशी मिळाली आहे. दिलीप आणि चिदविलास यांनी 'स्नूकरची' फेरी खेळली आणि खूप छान वेळ घालवला. त्यांनी दिवाळी फराळ आणि रात्रीच्या जेवणाचा आनंद घेतला. आम्ही त्यांना घरी सोडले तेव्हा ते रात्री ११ वाजेपर्यंत इथेच होते. ती एक सुंदर संध्याकाळ होती आणि त्यांच्या उपस्थितीने आमचे घर जिवंत झाले.

**सौ. शकुंतला आणि श्री दिलीप शिंदे**

मंडळाचे याबद्दल खूप आभार! या कार्यक्रमात एकत्र असल्याने आम्हाला, मराठी विद्यार्थी आणि कुटुंबांना जोडण्याची संधी मिळाली. या मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांचा मिळालेला पाठिंबा आणि तुमचे नेतृत्व यामुळे खरोखरच बदल घडेल. या सुखद अनुभवाने आमच्यावर कायमची छाप सोडली आहे. भविष्यातही मराठी समाजाचे असेच सशक्त उपक्रम आयोजित करत राहण्यासाठी आम्ही तुमच्या प्रयत्नांना पाठिंबा देऊ.

**सौ रुपाली आणि श्री. सुनील बडवे**

मातृभोजनाच्या निमित्ताने आम्ही बडवे कुटुंबाच्या घरी भेट दिली. आमची दिवाळी रुपाली मावशीच्या चवदार जेवणाने आणि सुनील काका आणि त्यांच्या दोन मुली मनाली आणि जयश्री यांच्यासोबतच्या मजेदार गप्पानी खास बनली होती! मी आणि नुपूर आम्हाला दिलेल्या सर्व उबदार प्रेमाबद्दल अत्यंत कृतज्ञ आहोत, विशेषत: आम्हाला गरजेच्या अनेक गोष्टी भेट स्वरूपात दिल्याबद्दल. लवकरच आम्ही पुन्हा एकत्र भेटू !!!! उपक्रमाबद्दल मंडळाचे खूप आभार.

**नुपूर व कनका**

**मराठा तितुका मेळवावा , महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।**

## गणपती पेंटिंग प्रदर्शन

कु. तन्वी मोरे इयत्ता ८ वी, हल्ली मुक्काम: नेब्रास्का, ओमाहा, USA
मूळ गाव: चौंधाणे, सटाणा. श्री. गोकुळ रघुनाथ मोरे (आजोबा) सेवानिवृत्त कला शिक्षक.
मामाचे गाव : अजंग, धुळे श्री. चैत्राम बळीराम भदाणे (आजोबा) सेवानिवृत्त केंद्रप्रमुख.



तन्वीने २०२३ च्या गणपती उत्सवात हिंदू मंदिर, ओमाहा येथे ACRYLIC पेंटिंग प्रदर्शन आणि मूक लिलाव भरवले ज्यामध्ये तिने १६ आकर्षक श्री गणेश पेंटिंग्स सादर केली. त्यासाठी ती मागील एक वर्षांपासून प्रयत्न करत होती. तिच्या चित्तवेधक आणि भावपूर्ण कलाकृतींनी मंदिराच्या भिंती सुशोभित केल्या. कलाप्रेमी आणि मंदिराच्या भक्तगणांनी प्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद दिला आणि सर्वांच्या औदार्याने प्रदर्शनादरम्यान एकूण $६११ गोळा केले गेले.

आपल्या हृदयात विशेष स्थान असलेल्या या पवित्र जागेला फूल नाही तर फुलाची पाकळी उक्तीप्रमाणे काहीतरी परत देण्याच्या भावनेने तन्वीने मनापासून संपूर्ण रक्कम मंदिराला दान करण्याचा निर्णय घेतला.

तिची सर्जनशीलता स्वीकारल्याबद्दल आणि या अर्थपूर्ण कारणाला पाठिंबा दिल्याबद्दल तसेच प्रतिकृतींना मूक बोली लावून जे आर्थिक योगदान दिले आणि एका कलाकाराच्या प्रगतीसाठी पोषक असलेल्या सूचना दिल्या त्याबद्दल सर्वांचे आम्ही मनापासून आभार मानतो. आपल्या जीवनात आणि समाजात प्रेम, कला आणि सकारात्मकता पसरवत राहू या!

**-Chhaya Gayee (Patil) - Nebraska Marathi Mandal**



